## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जानेवारी २००३

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक २००२/३९८१/प्र.क्र. ८४३(२)/म-१.—मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) (यानंतर ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात येईल) च्या कलम २, पोट-कलम (फ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि यासंबंधातील सर्व अधिसूचना अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन याद्वारे दिनाक १ जानेवारी २००३ पासून नोंदणी अधिनियम, १९०८ खाली निर्गमित केलेल्या शासन अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक नोंदणी २००२/३९४२/प्र.क्र. ८३७/म-१, दिनाक ३१ डिसेंबर २००२ अन्वये सातारा, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, बीड, जालना, लातूर, परभणी, उस्मानाबाद, बुलढाणा, यवतमाळ, गडचिरोली, वर्धा, भंडारा आणि चंद्रपूर या जिल्ह्यांच्या सह जिल्हा निबंधक (वर्ग-१ निम्नश्रेणी) म्हणून घोषित केलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या विहित केलेल्या कार्यक्षेत्राच्या मर्यादेत उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ " जिल्हाधिकारी " म्हणून घोषित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

अ. के. केळबाईकर,
कार्यासन अधिकारी.